# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

MIDC - DJMS
E&MD/ 7242
Date: 28/05/10.

'उद्योग सारथी,'
महाकाली गुहा मार्ग,
अंधेरी (पूर्व),
मुंबई ४०० ०९३.

क्र.मऔविम/सह मु.का.अ.(मा.तं.)/विधी विभाग/ ११० दिनांक: 26 MAY 2010

CE(HQ)

## परिपत्रक

EE(HQ)

विषय :- औद्योगिक क्षेत्रातील इमारती मधील पोटभाडयाने (Subletting) देण्याच्या मार्गदर्शक तत्वात सुधारणा करणेबाबत...

संदर्भ :- परिपत्रक क्र. मऔविम / विधी व कामकाज विभाग/९०/२००९, दि. २९/१०/२००९.

AE(V)

वरील संदर्भीय परिपत्रकान्वये महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील इमारती मधील क्षेत्र पोटभाडयाने देण्यासंदर्भातील मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली आहेत.

तथापि, उपरोक्त मार्गदर्शक तत्वात जागतीक मंदीमुळे सर्वांधीक तोटा हा माहिती तंत्रज्ञान उद्योगातील कंपन्यांना सोसावा लागत असल्याने त्यांना या अडचणीच्या काळात दिलासा देण्यासाठी प्रकरणी सुधारणा करणेबाबतची बाब महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २३/०२/२०१० रोजी झालेल्या ३३४ व्या सभेत विचारार्थ सादर करण्यात आली होती. सदर बाबीवर चर्चा होऊन ठराव क्र. ४९३० पारीत करण्यात आला.

त्यानुसार संदर्भीय परिपत्रकातील मुद्या क्र.१ नुसार बांधीव इमारतीतील क्षेत्र पोटभाडयाने देतांना पोटभाडे शुल्क औद्योगिक अथवा व्यापारी वापरानुसार त्या-त्या वर्षीच्या प्रचलित दराच्या ५ टक्के प्र.चौ.मी. प्रति वर्ष <u>ऐवजी</u> ३ टक्के प्र.चौ.मी. प्रति वर्ष या प्रमाणे प्रत्यक्ष भाडयाने दिलेल्या क्षेत्रफळावर आकारण्यात यावे.

..२/-

संदर्भीय परिपत्रकातील इतर अटी मध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सदरचे धोरण हे संचालक मंडळाने दिनांक २३/०२/२०१० रोजी घेतलेल्या निर्णयापासून आय.टी. उद्योग तथा इतर सर्व उद्योगासाठी लागू राहील याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

(राजेश नार्वेकर)
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा.तं.)**
**मऔविम, मुंबई-९३.**

प्रति,

१) मा. सह मुख्य कार्यकारी अधिकारी, (एम) मऔविम, मुंबई.
२) सह मुख्य कार्यकारी अधिकारी, मा व तं. , मऔविम, मुंबई.
३) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
४) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५) भू विभाग, कार्यासन १,२,३ व ४ मऔविम,
६) निवासी लेखा परिक्षण विभाग, मऔविम, मुंबई

प्रत :

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय, अंधेरी/ओरीएंट हाऊस/मध्यवर्ती मुख्य आदेश नस्ती/

मु. अ. (उ) मुंबई

C:\kini\v.s.kini\2007\Circulars File.doc